तालुका भ्रष्टाचार निमूर्लन समिती पुनर्गठित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.भ्रनिस-१८२५/प्र.क्र.७०/विचौ-२ (११-अ)**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दि. ०५ मार्च, २०२६**

**वाचा:-** १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र: अहत-१६१०/प्र.क्र.६४/१०/११-अ, दि.०४.०२.२०११

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र:कार्यशा-२०२५/प्र.क्र.०६/म-८, दि.०९.०४.२०२५

३) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने केलेल्या शिफारशी दि.०९.०७.२०२५

शासकीय कर्मचाऱ्यांविरुध्द प्राप्त होणाऱ्या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी विभागीय, जिल्हा तसेच तालुका पातळीवर भ्रष्टाचार निर्मूलन समित्या तसेच विभागनिहाय जिल्हा दक्षता समित्या स्थापन करण्याचा निर्णय संदर्भ क्र.१ येथील दि.०४.०२.२०११ च्या शासन परिपत्रकान्वये घेण्यात आला असून, या समित्यांची रचना व कार्यपध्दती याबाबतच्या सूचना/तरतूदी विहित केल्या आहेत.

२. महसूल प्रशासनाच्या अध्यक्षतेखालील गठीत विविध समित्यांचा आढावा घेऊन व एकाच उद्दीष्टासाठी कार्यरत असलेल्या, बहुसंख्य सदस्य समान असलेल्या व सदस्य सचिव समान असलेल्या समित्यांचे एकत्रिकरण करणे, समिती रचनेमध्ये बदल करणे याबाबत अभ्यास गटाद्वारे शिफारस करण्यासंदर्भात तसेच परिणामकारक आणि लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्याच्या दृष्टीने, योजनांची प्रभाविता, कार्यक्षमतेचे मुल्यांकन, माहिती व्यवस्थापन प्रणाली इ.चा सखोल अभ्यास करुन सुधारीत उपाययोजना व शिफारशी करण्यासाठी महसूली विभागस्तरावरील विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विषयवार एकूण सहा अभ्यास समित्यांची स्थापना संदर्भ क्र.२ येथील दि.०९.०४.२०२५ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली होती.

३. "महसूल प्रशासनाच्या अध्यक्षतेखाली गठीत विविध समित्यांचा आढावा घेऊन सुसुत्रीकरण करणे" या विषयाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत (समिती क्र.१) समितीने संदर्भ क्र.३ नुसार आपल्या शिफारशी दि.०९.०७.२०२५ रोजी शासनास (महसूल व वन विभागास) सादर केल्या आहेत. समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने **तालुका भ्रष्टाचार निर्मुलन समिती खालील प्रमाणे पुनर्गठीत करण्यात येत आहे -**

| | | |
|---|---|---|
| १ | उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी | अध्यक्ष |
| २ | पोलीस उप अधिक्षक | सदस्य |
| ३ | उप अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ४ | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ५ | उप विभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ६ | सहायक/उप निबंधक, सहकारी संस्था | सदस्य |
| ७ | मुख्याधिकारी नगरपरिषद/नगर पंचायत | सदस्य |
| ८ | तालुका कृषि अधिकारी | सदस्य |
| ९ | उप अधिक्षक, भूमी अभिलेख | सदस्य |
| १० | गट विकास अधिकारी | सदस्य |
| ११ | अशासकीय सदस्य (किमान ३ व कमाल ५) | सदस्य |
| १२ | तहसिलदार | सदस्य सचिव |

४. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील तालुक्यांमध्ये त्या त्या तालुक्यांमधील रहिवाशी असलेल्या योग्य व्यक्तींची, त्यांचे पोलीस अहवाल तसेच उपविभागीय दंडाधिकारी यांचा अहवाल लक्षात घेऊन आवश्यक त्या प्रमाणात तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समितीवर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करावी. असे करताना, संदर्भ क्र.१ येथील दि.०४.०२.२०११ मध्ये नमूद सर्व घटकांना सदर समितीवर प्रतिनिधीत्व प्राप्त होईल याबाबत दक्षता घ्यावी.

५. तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समितीवर अशासकीय सदस्याची नियुक्ती करताना सबंधित व्यक्तीचा पोलीस अहवाल प्राप्त करून घेणे बंधनकारक आहे. मात्र, पोलीस अहवाल प्राप्त करण्यास विलंब होत असल्यास, किमान उपविभागीय दंडाधिकारी यांचा अहवाल विचारात घेणे आवश्यक आहे. एखाद्या सदस्याच्या नियुक्तीनंतर प्राप्त झालेला पोलीस अहवाल प्रतिकूल असेल तर अशा सदस्याची नियुक्ती रद्द करण्यात यावी.

६. तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या सदस्यांना अध्यक्षाच्या पूर्वपरवानगीशिवाय बैठकीस अनुपस्थित राहता येणार नाही. एखादा सदस्य जाणूनबुजून, हेतूपुरस्पर गैरहजर राहील्यास, गैरहजर राहणाऱ्या सदस्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याबाबतचा अहवाल समितीच्या अध्यक्षांनी, जिल्हाधिकारी यांच्यामार्फत संबंधित विभागीय आयुक्त यांना सादर करावा.

७. तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समितीने, दर तीन महिन्यांनी होणाऱ्या बैठकीचा अहवाल न चूकता जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावा. तसेच समितीच्या त्रैमासिक बैठकीच्या अहवालांचा समावेश सहा गठ्ठे पध्दतीतील "नियतकालिके" या गठ्ठयात करुन, PR-A आणि PR-B नोंदवही जतन करावी.

८. सदर शासन परिपत्रकातील तरतूदी सर्व कार्यालय प्रमुखांनी आपापल्या कार्यालयांत दर्शनी जागी प्रदर्शित करुन सामान्य जनतेला याची माहिती होईल, असे पहावे.

९. तालुका भ्रष्टाचार निर्मुलन समितीबाबतच्या इतर सर्व सूचना/तरतूदी संदर्भ क्र.१ येथील शासन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे अंमलात राहतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०३०५१२४४२३८७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E08058C, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2026.03.05 12:45:16 +05'30'

**(सुचिता महाडिक)**

**सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री (न.वि.वि.) यांचे सचिव,
४. मा.उपमुख्यमंत्री (क्रिडा व उत्पादन शुल्क) यांचे सचिव,
५. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
४. सर्व मा. विधानमंडळ सदस्य
५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. अपर मुख्य सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई

८. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
९. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१०. सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
११. सर्व विभागीय आयुक्त/ अपर विभागीय आयुक्त (महसूल)
१२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ पोलीस महानिरीक्षक व संचालक, एसीबी,
१३. महाराष्ट्र राज्य, मुंबई/सर्व पोलीस उप महानिरीक्षक / सर्व पोलीस आयुक्त/ सर्व पोलीस अधीक्षक
१४. सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग
१५. सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी/ सर्व तालुका कृषि अधिकारी
१६. सर्व मुख्य वन संरक्षक
१७. सर्व सहनिबंधक, सहकारी संस्था
१८. सर्व जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी/ सर्व निवासी जिल्हाधिकारी/सर्व उप जिल्हाधिकारी
१९. सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२१. सर्व अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग
२२. सर्व विभागीय मृद संधारण अधिकारी/सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था/
२३. सर्व उप विभागीय अधिकारी/सर्व उप अधिक्षक, भूमी अभिलेख/
२४. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा/नगर पंचायती/
२५. सर्व गट विकास अधिकारी/सर्व तहसिलदार
२६. सर्व मंत्रालयीन विभाग
२७. मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख
२८. निवडनस्ती.